NOTARY
A. RASHID
D. SAYED
PUNE
REGD No
679/1994
Expiry Date
12/1/2023
STATE OF MAHARASHTRA

तात्काळ

कायम विनाअनुदान (इंग्रजी माध्यम)

आ.क्र.शिऊसं/प्राशि-३/नखाप्राशा/पुवि-०९
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 2 DEC 2009

प्रति,
शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे-५.

विषय : २००९ - २०१० या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नविन प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत . .

संदर्भ : १.शासन पत्र क्रमांक नप्राशा-१००८/प्र.क्र.९७८/प्राशि३दि.१८.८.२००९
२.मा.प्र.शिक्षण सहसंचालक (प्राथ.),प्राथमिक शिक्षण संचालनालय,म.रा.पुणे, यांचे पत्र क्र.नप्राशा/२००८-०९/इंग्रजी/मान्यता/ड ५१२(ब)/३७२८ दि.८/१०/२००९.

उपरोक्त विषयाचे संदर्भान्वये आपणांस कळविण्यांत येते की, खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेस तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सन २००९ - २००१० या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर नविन प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन आहे.

| अ. क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | ठिकाण | इयत्ता | माध्य |
|---|---|---|---|---|
| १. | सेंट मेरीज सोसा. स नं.२४७/१४ व्ही. प्लॉट नं. १७ बी डेक्कन कॉलेज रोड येरवडा पुणे ६. | सेंट मेरिज पब्लिकस्कूल, स नं.२४७/१४ व्ही. प्लॉट नं.१७ बी डेक्कन कॉलेज रोड येरवडा पुणे ६. | पहिली | इंग्रजी |

कायम विनाअनुदानीत

त्यामूळे या संस्थेकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण समक्ष भेट घेऊन विहित नमून्यातील स्वयंस्पष्ट शिफारशीसह आपला अहवाल १५ दिवसाच्या आंत या कार्यालयास सादर करणेबाबत कळविण्यांत येत आहे..

आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधित संस्थांना शाळा परवानगी देणे/ न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करण्यांत येतील.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम. १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५०-प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी..
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक / माध्यमिक शाळांपैकी एखादया शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रार आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमून्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नांव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.
७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.
८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यांत पूर्ण करेल.
९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.
१०. सक्षम अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थांना मान्यता देतांना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विदयार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच आपला अभिप्राय सादर करावा.व त्याआधारेच शाळेची परवानगी दिली जाईल.
११. सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकडया संबंधित संस्था उघडणार नाही. असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँम्पपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यांत आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकडया संबंधित शाळा काढणार नाही. याबाबत देखिल संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँम्पपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१३ शासन निर्णय क्रमांक माशानु/२००७/(१००१/२००७) (३) माशि-१,दिनांक ११.१०.२००७ मधील तरतूदीनुसार सदर शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेली सदर शाळा अठरा महिन्याच्या आत सुरु करणे बंधनकारक राहील. अन्यथा या शाळांचे परवानगीचे आदेश रद्द झाले आहेत.असे गृहीत धरले जाईल.सदर शाळा १८ महिन्याच्या आत संस्था सुरु करणार असल्यास तसा संस्थेचा ठराव सादर करण्यात यावा. सदर शाळा २००९-१० मध्ये सुरु केलेली नसल्यास व भविष्यात शाळा सुरु करावयाची नसल्यास त्याबाबत संस्थेचे लेखी पत्र आपले अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावे.

प्राथमिक शिक्षण कार्यालय पुणे म.न.पा.
आ.क्र. 92142
दिनांक 9/12/09

१४ संस्थेकडून रु. १०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावर इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही असे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व त्याच्या साक्षांकित प्रती आपण आपल्या संबंधित नस्तीवर कायमस्वरूपी जतन करून ठेवाव्यात.

१५ संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यात यावी. (उदा:- नाव, जात, जन्मतारीख; नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता)

१६ जनहितार्थ या.क्र.४८३/०४ मध्ये मा..सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४ एप्रिल, २००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१. शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.
२. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तु ठेवण्यात येवू नयेत.
३. शाळेचा संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.
४. सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India ) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देणेपूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.
५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी (National Building code of India) चे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/ कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ १. शासन पत्र क्रमांक याचिका २००९/प्र.क्र. २४४/प्राशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर, २००९

२. संचालनालयाचे पत्र क्र. संकीर्ण /२००९/६४११६/याचिका/१५ क (८) १३४४, दिनांक २[illegible] सप्टेंबर, २००९

३ शासन निर्णय क्रमांक १९०९/प्र.क्र.४३१/प्राशि-२, दिनांक २०/१०/२००९

(कु-हाडे सु. जं.)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१.करिता

स्वाक्षरीवर मा. शि. उ. सं.
यांची सही असे.

प्रत : माहितीसाठी सविनय सादर
प्रत : १.मा.सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-३२.
२.मा. शिक्षण संचालक, (प्राथमिक),प्राथमिक शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे-१
प्रत माहिती व कार्यवाहीसाठी
प्रत : अध्यक्ष/सचिव
सेंट मेरीज सोसा. स.नं.२२७/१४ प्लॉट नं. १७ बी डेक्कन कॉलेज रोड येरवडा पुणे ६.

प्रत : शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद,पुणे.

TRUE COPY
A. RASHID D. SAYED
NOTARY, STATE OF MAHARASHTRA
PUNE.

Verified By
Adv. D. D. AHIRRAO
KHARADI, PUNE-14

NOTARY ★ STATE OF MAHARASHTRA ★
A. RASHID D. SAYED PUNE
REGD. No 679/1994
Expiry Date 12/1/2[illegible]3